# राशिभविष्य - ऑगस्ट, २०२३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी याच राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे
आरोग्य सुधारेल व तो लेखन, संशोधन व सर्व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील राहूमुळे सतत अपमान होतील व वातविकाराचा आजार त्रस्त करील. हर्षलमुळे स्वभाव चंचल, लहरी, अस्थिर असा होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत रवि व शुक्र असून हा शूक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. या वक्री अवस्थेतच महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत जात आहे. येथील रविही महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, अपघात, कौटुंबिक त्रास, प्रिय जनांपासून फारकत होणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करणे अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. पण शुक्र वक्री असला तरी शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल व सर्व प्रकारच्या कलाकारांना अडचणींना तोंड देत प्रगती करावी लागेल. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळामुळे स्थावरसंबंधी वाद निर्माण होणे संभवते. तसेच संततीपैकी कोणाच्या अयोग्य आचरणविषयक समस्येमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत जात आहे. तेव्हा त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इजा होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, चोरी होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. येथील बुधामुळे सुद्धा स्त्री व संततीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून तो सुद्धा वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करू शकेल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे अनुकुल होईल, आर्थिक प्रगती होईल; पण मुलांपैकी कोणास कसला तरी असह्य त्रास होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता अस्वस्थ करील व त्यामुळे नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणपति अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ-** या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु अध्यात्म व समाजसेवा यांची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. येथील राहूमुळे अर्थलाभ होऊ शकेल; पण त्याच्यामुळे दिखाऊ आचरण होणे संभवते. येथील हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी निर्माण होणे, शत्रुत्व निर्माण होणे, अपघात होणे, बेअब्रू होणे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत असून महिन्याच्या उत्तरार्धात वक्री अवस्थेतच या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो वक्री असल्यामुळे ज्या गोष्टी लाभदायक ठरणार आहेत त्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, दु:ख, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत येथील मंगळामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे संततीपैकी कोणाच्या आचरणविषयक समस्येमुळे मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत असलेल्या बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल; पण आर्थिक नुकसान होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व त्याच्यामुळे मनस्थिती उदार होईल, आरोग्य उत्तम राहील, आचारविचार उच्च होतील व सहकार्य लाभेल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो वकिली व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणे, आर्थिक घोटाळे निर्माण होणे, अर्थप्राप्तीस विलंब होणे, कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप होणे संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकराची " व "श्रीहनुमानाची" उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी " हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत असून महिन्याच्या उत्तरार्धात वक्री अवस्थेतच या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो सर्व प्रकारे अनुकुल असला तरी वक्री असल्यामुळे मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या सुखात बाधा, अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेला रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे, डोळ्याचे अनारोग्य होणे, आर्थिक नुकसान होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत गेल्यावर सर्व प्रकारे अनुकुल, सुखकारक व लाभदायकच होईल. या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे महत्वाकांक्षा वाढेल, धैर्य, हिंमत वाढेल, हातून कर्तृत्व घडेल व काही मंडळींना प्रवासयोग येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूचा त्रास होणे संभवते.

या राशीच्या पंचम स्थानी तुळा  राशीत केतू असून तो  उपासना व गूढ संशोधन यांची आवड असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो कायदा, तत्वज्ञान, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील.  या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होणे संभवते.  या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गुरु-राहू- हर्षल असे तीन ग्रह असून  येथील गुरुमुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होईल, वाहनसुख मिळेल, विवाहेच्छूना विवाहयोग येईल, येथील राहू बौद्धिक दृष्ट्या अनुकुल असला तरी ज्यांच्या हातीअधिकार आहे अशापैकी काही मंडळींना  वाममार्ग धन प्राप्त करून घेण्याचा मोह  अस्वस्थ करील. पण त्यांनी असा मोह मनावर ताबा ठेवून टाळावाच. तेच सुखाचे होईल. येथील हर्षलमुळे  मित्रांशी वाद,भांडणे होणे संभवते. पण त्याच्यामुळे निश्चित काय घडेल ते सांगता  येणे कठिण  दिसते. श्रद्धा असेल तर "शिवशंकराची  व "दुर्गा देवीची उपासना अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल.  त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  "शिवलीलामृत स्तोत्रा"चे आणि "दुर्गादेवी स्तोत्रा'चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने  ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः" तारक  मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:"  तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -**  या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. व महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या धन स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो सर्व प्रकारे सुखदायक असला तरी  वक्री असल्यामुळे सहजासहजी सुखदायक होणे कठीण दिसते. तसेच  येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी  सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात  प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य,चिंता, मनस्ताप, आर्थिक समस्या  त्रस्त  करतील. आर्थिक हानी होणेही संभवते. तसेच डोळ्यांचे अनारोग्य होणेही  संभवते. या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत मंगळ  व बुध  असे दोन ग्रह आहेतच.  पैंकी बुधामुळे  अकारण शत्रुत्व निर्माण होणे,  शत्रुभय  निर्माण होणे संभवते.  येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत  जात आहे. अशा परिस्थितीत  तो महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल व  त्याच्यामुळे आर्थिक समस्या  त्रस्त करतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी  गेल्यावर  अनुकुल  होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्वाकांक्षा  वाढेल. हातून कर्तृत्व  घडेल; पण एखादी दुखापत होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा  राशीत केतु  असून  त्याच्यामुळे कोणाशी पटणार  नाही. कसली  तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक  असल्यामुळे बाहरचे उघड्यावरचे  पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि  असून त्याच्यामुळे दु:ख, दैन्य प्राप्त होणे संभवते. शिवाय तो अपघातभयकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. तसेच त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मीन  राशीत नेपच्यून  असून तो अध्यात्माची आवड असणारांना  अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील  तर काहींना  परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल  असे तीन ग्रह असून येथील गुरु  उच्च बौद्धिक  व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल,प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील राहूही शासकीय नोकरदार मंडळींना  अनुकुल होईल व काही मंडळींना बढती, अधिकार  पद  मिळणेही संभवते.  तसेच क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते.

येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील.श्रद्धा असेल तर"श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः: तारक मंत्राचा,आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि -शुक्र या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल; व त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे, अनारोग्य होणे, थकवा येणे, मनस्ताप होणे, कसली तरी चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे संभवते. पण शुक्र अनुकुल असला तरी वक्री असल्यामुळे सहजासहजी अपेक्षित सुखसमाधान लाभणे अशक्य दिसते. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी प्रथमपासून मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, त्यातून शरीरपीडा, दगदग होईल, मानापमान फार असतील, अनारोग्य होईल व आर्थिक चिंता त्रस्त करतील. येथील बुधामुळेही धननाश, मित्रद्रोह होणे संभवते. शिवाय चंचल, अस्थिर मनस्थितीमुळे कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळेही मानसिक दु:ख होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील; पण विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून गुरुमुळे ज्यांना अध्यात्मात रस असेल त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. प्रवासाचे योग येतील. राहूमुळे सभाधीटपणा येईल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. . त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र जरी महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी अपेक्षित सुखसमाधान लाभेलच याची खात्री देता येत नाही. पण रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल लाभदायक होईल. त्याच्यामुळे शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना बढती, पगारवाढ मिळू शकेल, क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळेल तर कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा

होणे, मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व मंगळामुळे स्वभाव हट्टी होईल, अकारण श्रम, दगदग कराल, शरीरपीडा होईल, मानापमान फार असतील व , कसली तरी चिंता त्रस्त करील.मानहानी होणे संभवते. बुधामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल, मानहानी होणे संभवते, अनारोग्य होणेही संभवते. त्याशिवाय कुसंगतीची बाधा होणे, मित्रद्रोह होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो दशम या व्यवसाय स्थानास अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे, शत्रुत्व निर्माण होणे, भांडणे होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. राहू अनारोग्यकारक होईल व हाती अधिकार असलेल्यांपैकी काहींना वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह अनावर होईल. येथील हर्षल अपघातकारक होईल. जपा. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकराची उपासना “ अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून त्याच्यामुळे सुख, ऐषाराम लाभेल. पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो चिकाटीचा गुण देणारा असल्यामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी असा घडणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच आजारभावना किंवा काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु अनुकुल व लाभदायक होईल; प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रवास योग येईल, .विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. पण या स्थानी असलेल्या राहू व हर्षलमुळे मनात कपटी विचार येतील व विवाहितांच्या वैवाहिक सुखात बाधा निर्माण होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत मतभेद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी कर्क राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे व महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो सुखकारक होईल व ऐषाराम मिळेल, मन:शांती लाभेल व अर्थलाभही होईल. पण तो वक्री असल्यामुळे सुखासुखी असे सर्व घडेलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या दशम स्थानी असलेला रविही महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायकच होईल. पण या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अल्पसा अनुकुल होईल व काही मंडळींना एखादी मौल्यवान

वस्तू  देणे संभवते. पण त्याच्यामुळे मैत्रीत वितुष्ट  येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता, वाद, भांडणे, वैवाहिक जीवनातील  सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या बुधामुळे सुखसमाधान लाभेल, मित्रलाभ व धनलाभ  होईल. श्रद्धा असेल तर "शिवशंकराची " व "श्रीहनुमानाची उपासना " अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे  त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक व सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन  राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. पण तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत गुरु-राहू -हर्षल असे तीन ग्रह असून गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील, राहू परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. हर्षलमुळे सतत अति खोल विचार करत असणारांना डोकेदुखी किंवा  मेंदूविकाराचा आजार होणे  संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून तो वक्री होत आहे. तसेच हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भय, मानसिक ताण, अनारोग्य, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे व्यावसयिक प्रगती होईल, अर्थलाभ होईल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होणार असला तरी  तो वक्री असल्यामुळे अपेक्षित सुखसमाधान मिळेलच याची खात्री देता येत नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात  त्याच्यामुळे दु:ख व अडचणी मनस्ताप देतील. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध  असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. काही मंडळींना  हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही मंडळींना एखाद्या मौल्यवान  वस्तूचा लाभ होणे संभवते. येथील  बुध अनुकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी, चंचल, अस्थिर होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्री हनुमान यांची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष  स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी " हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा  आहे त्यांनी "ओम मित्राय  नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना नवी नोकरी मिळेल, तर काहींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंताही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी सुखासमाधानात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून गुरुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल.अर्थलाभ होईल, ज्यांचे प्रेमसंबंध आहेत त्यांचे प्रेमसंबंध दृढ होईल व सर्व सुख मिळेल. पण येथील राहूमुळे वरील सर्व सुखात बाधा येण्याची दाट शक्यता दिसते. येथील हर्षलमुळे क्वचित कोणास अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होईल. तसेच उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीचा अष्टम स्थानी कर्क राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत जात आहे. तसेच येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, आजार, अपयश, भय, चिंता, मानसिक ताण अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. येथील शुक्र अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे मिळणाऱ्या सर्व गोष्टी सहजासहजी मिळणे शक्य होणार नाही. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. आणि येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व मंगळामुळे अनारोग्य होणे, हाडमोड होणे, वीज, पाणी यांपासून धोका असणे, प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. तसेच बुधामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील तसेच वाद, भांडणे होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुलच होईल व सर्व काही सुखाचेच घडेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निॠतये नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नम::” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नम::” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो अध्यात्म व गूढ संशोधनाची मनापासून ओढ असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधाल लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदी -विक्रीचे व्यवहार पूर्ण होतील, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. पण येथील राहू व हर्षल दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व हर्षलमुळे कशातच सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. राहूमुळे कौटुंबिक त्रास,

अनिष्ट घटना घडणे संभवते. तसेच हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. तसेच हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, अपयश, संततिसुखात बाधा येणे, इच्छा अपेक्षा अपूर्ण राहणे संभवते. येथील शुक्र अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे

मिळणारे सुखसमाधान सहजासहजी मिळणे शक्य दिसत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत मंगळ महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कष्ट, हाडमोड होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका; खोल पाण्यात पोहू नका. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रवासात मानहानी, मनस्ताप होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेला बुध अनुकुल, सुखदायक व यशदायक होईल. कार्यसिद्धी होईल. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण मनावर ताबा ठेवून त्यांनी तसे करण्याचा विचारही करू नये. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना आणि श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच स्वराशीत शनि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी काहींचे दूरत्व निर्माण होणे, अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील; पण भावंडांकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. राहूमुळे हातून कर्तृत्व घडेल, पण बंधुसुखात बाधा येणे संभवते. तसेच येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काहींना परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. त्यामुळे येथील रवि दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल,पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. येथील शुक्र कला क्षेत्रास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी कलेत प्रगती होणार नाही. अशा परिस्थितीत आपल्या कलेतील कर्तृव सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे रवि -शुक्र दोन्ही ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत जात आहेत. त्या काळात रवि अनारोग्यकारक होणार असला तरी तो स्वराशीत व केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होण्याची शक्यता दिसते. शुक्र प्रेमसंबंधास व वैवाहिक जीवनातील सुखास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे त्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. पण येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात संशय, वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे अनारोग्य, हाडमोड होणे संभवते. शिवाय तो जलभयकारक व वीजभय कारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. सप्तम स्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, भांडणे होणे

संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे दिखाऊ, ढोंगी, धूर्त प्रकारचे आचरण होणे संभवते. .तसेच त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैक चरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल, होईल, मानसिक संवेदना जलद होतील व मन उदास होऊन नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे . कुटुंबात शुभ घटना घडतील, आर्थिक लाभ होतील, नोकरी-व्यवसायात प्रगती होईल. पण राहूमुळे गुरुकडून मिळणाऱ्या सुखसमाधानात बाधा निर्माण होणे संभवते. येथील हर्षलमुळे मनस्थिती अति चंचल, लहरी होईल व हातून अविचारी आचरण घडेल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही समजणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून येथील शुक्र दिनांक ७ पासून वक्री होत आहे. पण येथील रविमुळे अनारोग्य होणे, अपघात होणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे संभवते. प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण होईल, व संततिसुखात बाधा येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम य व्यवसाय स्थानास पूरक होईल, पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत असलेला शुक्र सर्व प्रकारच्या कलावंतांना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे कलेतील प्रगतीत अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. शिवाय तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर तर अधिकच अडथळे येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. पण येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक हानी होणे संभवते. शिवाय विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच संशय, गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येण्याची शक्यताही दिसते. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला बुध मात्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, धनलाभ होणेही संभवते. क्वचित कोणास कीर्ति,प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, कुटुंबात कलह निर्माण होणे, अपघात होणे अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे संकटपरंपराच कोसळेल. मानहानी होईल व त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====